## रे.दि.मु.नं.१५७/२००९ मधील नि.६३ खालील आदेश

१. सदरचा अर्ज हा वादीने कोर्ट कमिशनसाठी दाखल केलेला आहे.

२. यात वादी यांचे थोडक्यात कथन असे की,

सदरचा दावा हा वादी यांनी बी.डी.एन. ६/२००५ मधील तहसिलदार, कोरेगाव यांनी मौजे करंजखोप, ता. कोरेगाव, जि. सातारा येथील गट नंबर ११५७ मधील ०.१० आर क्षेत्र हे अतिक्रमीत क्षेत्र असून त्याचा कब्जा देणेचा झालेला हुकूम रद्दबादल होवून सदर ०.१० क्षेत्र वादी व प्रतिवादी क्र. २ च्या मालकी वहिवाटीचे असून गट नंबर ११५८ चा भाग असलेबाबतचा जाहीर ठराव होवून मिळणेसाठी तसेच निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे.

३. सदर अर्जाव्दारे वादीचे पुढे असे कथन आहे की, गट नंबर ११५८ ही मिळकत वादी यांचे मालकी हक्क कब्जेवहिवाटीची तर गट नंबर ११५७ ही मिळकत प्रतिवादी क्र.१ याचे मालकी हक्क कब्जेवहिवाटीची आहे. सदर गट नंबर ११५७ ची मोजणी मो.रं.नं. ११३ नुसार दिनांक २२ व २३/०३/१९९८ रोजी केली आहे तर गट नंबर ११५८ ची मोजणी मो.रं.नं. २१७० नुसार दिनांक १६/१२/२००६ रोजी करण्यात आली आहे. सदर दोन गटांच्या मोजण्या वेगवेगळया केल्यामुळे सदरचे अतिक्रमीत ०.१० आर क्षेत्र हे गट नंबर ११५८ चा भाग आहे अथवा नाही हे दिसून येत नाही. सदरची बाब अभिलेखावर येणेकामी सदर दोन्ही गटांच्या मोजण्या एकत्रात केल्यास त्याबाबतची खरी परिस्थिती अभिलेखावर येणार आहे. सबब, वादीने गट नंबर ११५७ व ११५८ या दोन गटांची एकत्राची मोजणी तालुका भूमी अभिलेख कोरेगाव यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ति करून करण्यास परवानगी मिळणेस विनंती केली आहे.

४. प्रतिवादी यांनी सदर अर्जास निशाणी ६५ कडे म्हणणे दाखल करून वादीच्या अर्जास विरोध दर्शविला आहे. प्रतिवादी यांच्या कथनांनुसार, वाद मिळकतीची मोजणी प्रतिवादीतर्फे २९/०३/१९९८ व १६/१२/२००६ तर वादीतर्फे १६/१२/२००६ रोजी करण्यात आली आहे. तसेच बी.डी.एन. ०६/२००५ ही केस

व त्यावर अपील झाले आहे. सदरच्या सर्व मोजण्यांमध्ये वादीने प्रतिवादी यांचे मिळकतीमध्ये १० आर क्षेत्रात अतिक्रमन केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदरचा अर्ज केवळ दाव्याचे कामकाज लांबविण्यासाठी दाखल केलेले आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी प्रस्तूतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. वादी व प्रतिवादींतर्फे सन्माननिय विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दोन्ही पक्षकारांचे वादकथन व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, अतिक्रमीत १० आर क्षेत्रावरून वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान वाद असल्याचे स्पष्ट दिसून येते. गट नंबर ११५७ ची मोजणी मो.रं.नं. ११३ नुसार दिनांक २२ व २३/०३/१९९८ रोजी तर गट नंबर ११५८ ची मोजणी मो.रं.नं. २१७० नुसार दिनांक १६/१२/२००६ रोजी वेगवेगळी केल्याचे दिसून येते. तसेच सदरच्या दोन्ही मोजण्या हया दावा दाखल करण्यापुर्वी झाल्याचेही दिसून येते. त्यामुळे वादातीत क्षेत्राची सद्य स्थिती अभिलेखावर येण्यासाठी गट नंबर ११५७ व ११५८ या दोन गटांची संयुक्तीक मोजणी होणे गरजेचे आहे. सदर मोजणीने दाव्याचे स्वरूपामध्ये कोणताही बदल होणार नाही. उलट दाव्याचा निकाल गुणावगुणावर होणेसाठी व दाव्याची अनेकता टाळण्यासाठी सदरची मोजणी उपयुक्त ठरणार आहे. सबब, प्रस्तूतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. त्यामुळे, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. वादीचा निशाणी ६३ अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. उपअधिक्षक, भूमीअभिलेख कोरेगाव यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येते.

३. न्यायालयीन आयुक्तांनी स्वत: अगर भूकरमापक यांचेमार्फत मौजे करंजखोप, ता. कोरेगाव, जि. सातारा येथील गट नंबर ११५७ व ११५८ या मिळकतींची त्यामध्ये असलेले बांध व झाडे—झुडप यांचेसह सदर मिळकतींच्या सभोवतालची सद्य परिस्थितीची, चतु:सिमा व मोजमापासह मोजणी दोन्ही पक्षकारांना आगाऊ सूचनापत्रे देवून करावी. मोजणीमध्ये सदर मिळकतीमध्ये काही अतिक्रमण आढळल्यास त्याचा सविस्तर खुलासा मोजणी अहवाल व नकाशामध्ये करावा आणि आपला अहवाल दोन महिन्याचे आत न्यायालयास सादर करावा.

४. वादीने आवश्यक मोजणी शुल्क संबंधीत कार्यालयात सात दिवसांचे आत परस्पर जमा करावे.

५. न्यायालयीन आयुक्तांना आयुक्त नेमणूकीचे पत्र पाठवावे.

दिनांक :— २५/०१/२०१६.

( एन.बी.घाटगे )
२रे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर,
कोरेगाव.